(७)



# विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांचे कार्यालय

## आदेश

**क्र.बी-४(१)/३६७/२०२५** **दिनांक :-२६/०५/२०२५**

**वाचा :-** मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनीय पत्र क्र. बी(जन)-५६०१/५७/२०२४/१६४५, दिनांक ०५/०९/२०२४

*****

या कार्यालयाच्या आस्थापनेवरील विविध न्यायालयातील शिपाई पदाची रिक्त पदे भरण्याचे दृष्टीने, मी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती याद्वारे खालील आदेश पारित करीत आहे.

सल्लागार समिती, जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती द्वारा तयार केलेल्या निवड यादीला मा. उच्च न्यायालय, मुंबई यांची मंजुरी मिळाल्याचे अनुषंगाने सदरहू निवड यादीमधील खालील **अनु.क्र. २४ ते ३१** प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांची शिपाई पदावर तात्पुरत्या स्वरूपात (वेतन मॅट्रिक्स - एस-१, रूपये १५०००-४७६०० अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते) नियुक्ती करण्यात येत असून त्यांची खालीलप्रमाणे रिक्त असलेल्या पदांवर खालील अटी व शर्तीस अधीन राहुन नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | नियुक्तीचे/नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | **श्री. प्रसाद कृष्णकुमार मालवे,**<br>रा. संभाजी नगर, दिग्रस,<br>जि. यवतमाळ - ४४५२०३<br>**(शिपाई पदाच्या निवड यादीमधील उमेदवार अनु.क्र. २४)** | जिल्हा न्यायालय, अमरावती येथील श्री. पी.जी. राठोड, पहारेकरी यांच्या स्थानांतरणामुळे रिक्त झालेल्या पदावर करण्यात येत आहे. |
| २ | **श्री. आकाश मनोहर नितनवरे,**<br>रा. एकता नगर, कांडली,<br>परतवाडा, ता. अचलपूर,<br>जि. अमरावती - ४४४८०५<br>**(शिपाई पदाच्या निवड यादीमधील उमेदवार अनु.क्र. २५)** | ७वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती येथील रिक्त असलेल्या पदावर करण्यात येत आहे. |
| ३ | **श्री. सागर कैलास टिपरे,**<br>रा. लिहिदा, पोस्ट नेरपिंगळाई, ता. मोर्शी, जि. अमरावती - ४४४७०७<br>**(शिपाई पदाच्या निवड यादीमधील उमेदवार अनु.क्र. २६)** | १४वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती येथील रिक्त असलेल्या पदावर करण्यात येत आहे. |

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | नियुक्तीचे/नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|
| ४ | **कु. वंदना प्रल्हाद बावीस्कर,**<br>रा. कृषक कॉलनी, राम नगर, अमरावती - ४४४६०४<br>**(शिपाई पदाच्या निवड यादीमधील उमेदवार अनु.क्र. २७)** | ५वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती येथील रिक्त असलेल्या पदावर करण्यात येत आहे. |
| ५ | **श्री. संगीत विठ्ठल राठोड,**<br>रा. मु. सेवानगर, पो. शिवणी, ता. घाटंजी, जि. यवतमाळ ४४५३०१<br>**(शिपाई पदाच्या निवड यादीमधील उमेदवार अनु.क्र. २८)** | २१वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती येथील रिक्त असलेल्या पदावर करण्यात येत आहे. |
| ६ | **कु. मनिषा सुधाकरराव काटोळे,**<br>रा. माळीपुरा, चांदुर बा., ता. चांदुर बाजार, जि. अमरावती - ४४४७०४<br>**(शिपाई पदाच्या निवड यादीमधील उमेदवार अनु.क्र. २९)** | २२वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती येथील रिक्त असलेल्या पदावर करण्यात येत आहे. |
| ७ | **श्री. प्रदीप ज्ञानेश्वर जाधव,**<br>रा. रामगढ, पो. शेगी, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम ४४४४०३<br>**(शिपाई पदाच्या निवड यादीमधील उमेदवार अनु.क्र. ३०)** | ६वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती येथील श्री. के.के. बेठेकर यांच्या रिक्त असलेल्या पदावर करण्यात येत आहे. |
| ८ | **श्री. निलेश श्रीपतराव बोहरूपी,**<br>रा. महारूद्र विहार, प्रिमिअर स्कूल जवळ, अर्जुन नगर, अमरावती - ४४४६०३<br>**(शिपाई पदाच्या निवड यादीमधील उमेदवार अनु.क्र. ३१)** | ७वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती येथील श्री. ए.डी. काळे यांच्या रिक्त असलेल्या पदावर करण्यात येत आहे. |

## अटी व शर्ती

१. उपरोक्त उमेदवारांची शिपाई पदावरील नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपाची असून त्यांची सेवा कोणत्याही वेळेस आणि कोणतेही नोटीस अथवा कारण न देता समाप्त करण्यात येईल. त्यांनी तशाप्रकारचे लेखी हमीपत्र विहीत नमुन्यात रूजू होतांना कार्यालयास सादर करावे.

२. उपरोक्त उमेदवारांनी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील नियम ११ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती यांचेकडुन वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करून सादर करावे. त्याकरिता सदरहू नियुक्ती आदेशासोबत उमेदवाराच्या वैद्यकीय तपासणीबाबतचा नमुना जोडलेला आहे. तो त्यांनी पुर्णत्वे भरून रूजू होतेवेळी कार्यालयास सादर करावा.

३. उपरोक्त उमेदवारांची शिपाई पदावरील नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपाची असून त्यांच्याविषयी पोलीस विभागाकडून चारित्र्य अहवाल प्राप्त होण्याच्या शर्तीनुसार राहील. त्यानंतरच त्यांची सेवा पुर्ववत करण्यासंबंधी योग्य तो आदेश पारित करण्यात येईल. त्याकरिता पोलीस विभागाकडून अहवाल प्राप्त करण्यासंबंधी साक्षांकन नमुना यासोबत जोडलेला आहे. तो उमेदवारांनी पुर्णपणे भरून घेऊन रूजू होतेवेळी कार्यालयास सादर करावा.

४. उपरोक्त उमेदवारांना कायद्याद्वारे स्थापित भारतीय राज्यघटनेशी असलेल्या निष्ठेबाबतची शपथ रूजू होतांना घ्यावी लागेल.

५. जर त्यांना राजीनामा द्यावयाचा असेल, तर त्यांनी एक महिन्यापूर्वी नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन शासनाच्या आदेशानुसार शासनाकडे जमा करावे लागेल.

६. वरील नव्याने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना निर्देशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी **दिनांक ०९/०६/२०२५ रोजीच्या कार्यालयीन वेळेपासून रूजू व्हावे.** जर ते विहीत मुदतीत रूजू होण्यास असमर्थ राहिले तर त्यांची नियुक्ती पत्र हे रद्द समजण्यात येऊन त्यांचे नांव सदरहू निवड यादीमधुन कमी करण्यात येईल.

७. उपरोक्त उमेदवारांनी रूजू होतेवेळी ओळखीकरिता आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन परवाना, मतदान कार्ड तसेच त्यांचे मूळ प्रमाणपत्र कार्यालयास सादर करावे. या कार्यालयाने त्यांच्या मूळ प्रमाणपत्राची पडताळणी केल्यानंतर ते परत करण्यात येईल.

८. उपरोक्त उमेदवारांनी त्यांचे पदाचा विस्तृत कार्यभार रूजु झाल्याबद्दल ताबडतोब घ्यावा.

९. संबंधित कार्यालय प्रमुखांनी उपरोक्त उमेदवारांना विहीत नमुन्यात शपथ देऊन त्यांचेकडुन विहीत नमुन्यातील हमीपत्र प्राप्त करून घ्यावे व ते या कार्यालयास सादर करावे.

**सदरहू आदेश दिनांक ०९/०६/२०२५ रोजीच्या कार्यालयीन वेळेपासून अंमलात येईल.**

(Signature)

**(सुधाकर वें. यार्लगड्डा)**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
**अमरावती**

पृष्ठांकन क्र./आस्था./ ९८९९ /२०२५
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती,
दिनांक :- २६ /०५/२०२५

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीकरिता अग्रेषित** :-

१. प्र. अधिकारी (वित्त व रोकड विभाग) तथा जिल्हा न्यायाधीश-१, अमरावती
२. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती
३. मुख्य न्यायदंडाधिकारी, अमरावती
४. ७वे/१४वे/२१वे/२२वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती
५. ५वे/६वे/७वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती
६. अधिक्षक, प्रशासन/निरीक्षण जिल्हा न्यायालय, अमरावती
७. सहायक अधिक्षक, आस्था/रो.व वि., जिल्हा न्यायालय, अमरावती
८. प्रबंधक/स्वीय सहायक, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती
९. सचिव, अमरावती जिल्हा पत सहकारी संस्था, अमरावती
१०. श्री प्रसाद कृष्णकुमार मालवे, रा. संभाजी नगर, दिग्रस,
जि. यवतमाळ - ४४५२०३
११. श्री. आकाश मनोहर नितनवरे, रा. एकता नगर, कांडली,
परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती - ४४४८०५
१२. श्री. सागर कैलास टिपरे,
रा. लिहिदा, पोस्ट नेरपिंगळाई, ता. मोर्शी, जि. अमरावती - ४४४७०७
१३. कु. वंदना प्रल्हाद बावीस्कर,
रा. कृषक कॉलनी, राम नगर, अमरावती - ४४४६०४
१४. श्री. संगीत विठ्ठल राठोड, रा. मु. सेवानगर, पो. शिवणी,
ता. घाटंजी, जि. यवतमाळ - ४४५३०१
१५. कु. मनिषा सुधाकरराव काटोळे,
रा. माळीपुरा, चांदुर बा., ता. चांदुर बाजार, जि. अमरावती - ४४४७०४
१६. श्री. प्रदीप ज्ञानेश्वर जाधव,
रा. रामगढ, पो. शेगी, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम ४४४४०३
१७. श्री. निलेश श्रीपतराव बोहरूपी,
रा. महारूद्र विहार, प्रिमिअर स्कूल जवळ, अर्जुन नगर,
अमरावती - ४४४६०३
१८. निवड नस्ती.

माहिती व योग्य कार्यवाही करिता.

**(सुधाकर वें. यार्लगड्डा)**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
**अमरावती**